गौण खनिज

गावतळी, पाझर तलाव व बंधारे यातील गाळ/
माती शेतक-यांनी तसेच पारंपारिक कुंभार
समाजाच्या व्यक्तिने त्यांच्या व्यवसायासाठी
वापरावयाचा असल्यास, त्यांना
स्वामित्वधन व अर्ज फी न आकारता
स्वखर्चाने गाळ/माती काढून नेण्यास परवानगी
देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक. गौखनि १०९२-/प्र.क्र.५२/ख.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक. १९/३/१९९९.

वाचा:- शासन निर्णय, समक्रमांक दि. ५ मार्च १९९२.

शासन निर्णय:-

महाराष्ट्रात ब-याच गावांमध्ये गावतळी, पाझर तलाव व बंधारे निर्माण करण्यात आलेले आहेत. या गावतळी, पाझर तलाव व बंधारे यांत बराच गाळ साचल्यामुळे गावतळी, पाझर तलाव व बंधारे यांत त्यांच्या क्षमतेप्रमाणे पाणी साठू शकत नाही. तसेच या पाणलोट क्षेत्रातील गाळ शेतक-यांनी आपल्या शेतामध्ये वापरल्यास जमिनीच्या प्रतीमध्ये निश्चितपणे सुधारणा होऊन त्याप्रमाणे घेण्यात येणा-या पिकामध्येसुध्दा लक्षणीय वाढ होईल. याद्रृष्टीने शासन निर्णय, समक्रमांक दिनांक. ५ मार्च १९९२ अन्वये शेतक-यांना स्वामित्वधन व अर्ज फी न आकारता, गावतळी, पाझर तलाव व बंधारे यातील गाळ स्वखर्चाने काढून त्यांच्या शेतात टाकण्याची परवानगी देण्यात आली आहे. आता शेतक-यांबरोबरच राज्यातील पारंपारिक कुंभार समाजाच्या व्यक्तिंना त्यांच्या व्यवसाया-साठी आवश्यक असलेली "साधी माती/गाळ", गावतळी, पाझर तलाव, बंधारे यातून स्वखर्चाने काढण्याची सवलत मिळण्याबाबत राज्यातील ब-याच कुंभार संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनास प्राप्त झालेल्या निवेदनांचा शासनाने साकल्याने विचार करुन उक्त सवलत शेतक-यांबरोबरच पारंपारिक कुंभार समाजाच्या व्यक्तिस देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. "साधी माती/गाळ" काढल्यामुळे गावतळी, पाझर तलाव व बंधा-याच्या उच्चतम क्षमतेप्रमाणे पाणी साठेल व पर्यायाने भरपूर पाणी त्या परिसरात उपलब्ध होण्यास मदतच होईल.

...कार्यालय
रत्नागिरी.

२. सर्वसाधारणपणे "गाळ/साधी माती" गौण खनिजांतर्गत समाविष्ठ आहे. सदरील "गाळ/साधी माती" तलावातून काढून न्यावयाचा असेल तर अर्जासोबत रू. १००/- फी व प्रत्येक ब्रास "गाळ/साधी माती" करीता रू. २८/- स्वामित्वधन आकारण्यात येते. शासन परिपत्रक क्र. गौखनि २०२२/प्र.क्र. ९९/ख, दिनांक. १७ जुलै १९९८ अन्वये गौण खनिज विषयक प्रचलित असलेले नियम १] मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५ २] महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम [विदर्भ विभाग] १९६६ आणि ३] गौण खनिजाच्या कार्याचे नियमन करण्याबाबत नियम, १९५४ या तीनही नियमांतील अनुसूची १ मधील बाब क्रमांक. ४ [क] "साधी चिकण माती जे कुंभार उपयोगात आणतात" वगळण्यात आली आहे. त्याअनुषंगाने परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक हित लक्षात घेऊन गावतळी, पाझर तलाव व बंधा-यातील गाळ पारंपारिक कुंभार समाजाच्या व्यक्तिस त्याच्या व्यवसायासाठी वापरावयाचा असल्यास पारंपारिक कुंभार समाजाच्या व्यक्तिकडून "मुंबई गौण खनिज उत्खनन नियम, १९५५" व "महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम [विदर्भ विभाग] १९६६" च्या कलम ४[२] व १८[... १] व "गौण खनिजाच्या कार्याचे नियमन करण्याबाबत नियम, १९५४" च्या कलम ५ व २० मधील अटी शिथील करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्या अन्वये आता पारंपारिक कुंभार समाजाच्या व्यक्तिंनी जिल्हाधिका-यांकडे अर्ज सादर केल्यास त्यांना संबंधित कार्यकारी अभियंता/ उपअभियंता यांनी ज्या गावतळी, पाझर तलाव, बंधारे यामधील गाळ काढणे आवश्यक आहे. अशा प्रमाणित केलेल्या गावतळी, पाझर तलाव, बंधारे यातील गाळ विनामुल्य स्वखर्चाने काढून नेण्याकरीता परवानगी देण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक. प्र.क्र. ६०/९९/व्यय-९, दिनांक. २५/१/१९९९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

प्र.का.बर्वे
[प्र. का. बर्वे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.